महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)

# महाराष्ट्र सागरी मंडळ

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०

**Website :** https://mahammb.maharashtra.gov.in

**Email :** ceo.mmb@maharashtra.gov.in/ ceommb@gmail.com

महाराष्ट्र सागरी मंडळ या विभागामध्ये नायब तहसिलदार (गट-ब), मंडळ अधिकारी (गट-क) व तलाठी (गट-क) ही पदे निव्वळ कंत्राट पद्धतीने अकरा महिन्यांकरिता भरायची असून त्यासाठी महसूल विभाग, महाराष्ट्र शासन यांचे सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांचेकडून खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकत्रित ठोक वेतन | जिल्हा व पदसंख्या | अर्हता |
|---|---|---|---|---|
| १. | गट-ब<br>नायब तहसिलदार | अंतिम वेतन-निवृत्ती वेतन | पालघर - १<br>रायगड - १<br>रत्नागिरी - १<br>सिंधुदुर्ग - १ | नायब तहसिलदार या पदावरून महसूल विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले अधिकारी. |
| २. | गट-क<br>मंडळ अधिकारी | | पालघर - १<br>रायगड - १<br>रत्नागिरी - १<br>सिंधुदुर्ग - १ | मंडळ अधिकारी या पदावरून महसूल विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले अधिकारी. |
| ३. | गट-क<br>तलाठी | | पालघर - १<br>रायगड - १<br>रत्नागिरी - १<br>सिंधुदुर्ग - १ | तलाठी या पदावरून महसूल विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले. |

कंत्राट पद्धतीवरील नियुक्ती कालावधीत प्रतिमाह अदा करायच्या ठोक रकमेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीच्यावेळी असलेले अंतिम वेतनातून (महागाई भत्ता धरून) निवृत्तीवेतनाची रक्कम (महागाई भत्ता धरून) वजा केल्यानंतर येणारी रक्कम देय राहील.

उपरोक्त पदावरील नियुक्त्या या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पद्धतीवर करण्यात येत असून त्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसात मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, २ रा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१ यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेसह अर्ज करावेत. तसेच उपलब्ध पदांच्या तुलनेत प्रथमदर्शनी अर्हताप्राप्त उमेदवारांच्या अर्जांची संख्या व अनुभव विचारात घेऊन मुलाखतपत्र उमेदवारांसाठी निकष ठरविण्यात येईल व त्यानुसार त्यांची निवड करण्यात येईल. सदरची जाहिरात ही महाराष्ट्र सागरी मंडळाच्या https://mahammb.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरी/-**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.**

**डीजीआयपीआर-२०२३-२४/२३६०**